महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id: mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/५३४३
दिनांक :१७/०९/२०२१

# आदेश

विषय:- कोरोना विषाणू (कोविड - १९) संसर्ग साखळी तोडण्यासाठी " Break the Chain " सुधारित मार्गदर्शक सूचना

संदर्भ:-
१) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७
४) महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1 दि.१७.०४.२०२०, २१.०४.२०२०, २९.०६.२०२०, ६.०७.२०२०, ३१.०७.२०२० ३१.०८.२०२०,३०.०९.२०२०,१४.१०.२०२०,२३.१०.२०२०,३.११.२०२०, १४.११.२०२०,२३.११.२०२०,२७.११.२०२०,२१.१२.२०२०,२९.१२.२०२०, १४.०१.२०२१,१०.०२.२०२१,१५.०३.२०२१,१७.०३.२०२१, २७.०३.२०२१, ४.०४.२०२१, १३.०४.२०२१,२०.०४.२०२१,२१.०४.२०२१,२९.०४.२०२१, १२.०५.२०२१,३०.०५.२०२१,०४.०६.२०२१,१०.०६.२०२१,२५.०६.२०२१
५) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, आदेश क्रमांक : कोरोना-२०२१/प्र.क्र.३६६/आ-५, दि.११.०८.२०२१
६) मा.आयुक्त,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/४२७६ दि.१४.०८.२०२१

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ४ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात कोविड – १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी राज्यातील कोविड-१९ च्या प्रसारास प्रतिबंध करण्याकरिता प्रसारणाची साखळी प्रभावीपणे खंडित करण्यासाठी लावलेले निर्बंध जिल्हानिहाय / प्रशासकीय युनिटनिहाय शिथिल करणे तसेच विविध आर्थिक आणि सामाजिक उपक्रम नियोजनबद्ध सुरु करण्याच्या अनुषंगाने शासनाने सुधारित आदेश निर्गमित केलेले आहेत.

ज्याअर्थी सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड-१९ या संसर्ग रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले

आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे महापालिका क्षेत्रामध्ये रविवार दिनांक १९.०९.२०२१ रोजी अनंत चतुर्दशीच्या निमित्ताने होणारी गर्दी नियंत्रणात ठेवणेसाठी तसेच कोविड-१९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

१) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रकारची दुकाने आणि मॉल्स ( अत्यावश्यक सेवा वगळून ) रविवार दिनांक १९.९.२०२१ रोजी संपूर्णतः बंद राहतील.

२) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व हॉटेल, रेस्टॉरंट, फूडकोर्ट ( मॉल्स मधील वगळून ) रविवार दिनांक १९.९.२०२१ रोजी चालू राहतील.

३) या आदेशातील नमूद बाबीं व्यतिरिक्त इतर बाबींसाठी दिनांक १४.०८.२०२१ रोजी निर्गमित आदेश लागू राहतील.

४) सदर आदेश हे पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये येणाऱ्या पुणे कटक मंडळ व खडकी कटक मंडळ यांना देखील लागू राहतील.

५) संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि.१७.०९.२०२१ रोजी दिलेला आहे.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF PUNE
पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन
सन-१९५०
EST.1950

स्वाक्षरी/xxx
( विक्रम कुमार )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.
३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.
यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित...

निर्गमित

Raut

(रविंद्र बिनवडे)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
17/9/2021